# मनात १

**लेखक : मल्हार दंडगे**

**पात्र-परिचय**

**अनिकेत (वय साधारण २५-२८)**

**ऋतू (वय साधारण २५-२८)**

**आई (वय साधारण ५०)**

**माणुस (वय साधारण ३०)**

## प्रवेश १

(तीव्र पार्श्वसंगीत, रंगमंचावर प्रकाश, मध्यमवर्गीय घराचा हॉल, प्रेक्षकांच्या उजव्या बाजूला प्रवेशद्वार, डाव्या बाजूला गॅलरीच दार, त्याच्यापुढे टेबल त्यावर एक संगणक, बाजूला फळा आणि साहित्याने गॅलरीच दार झाकून जावं, या सगळ्यात एक तरुण जलद गतीत काम करतोय, घराची बेल वाजते, तरुण दार उघडतो, आणि परत होता त्या जागी येतो, एक समवयस्क प्रवेश करतो.)

तरुणः नाव काय?

समवयस्कः ऋतू.

तरुणः	आपण एकमेकांना कसं ओळखतो?

ऋतूः	(बालिशपणे) अरे मी! मी तुझा मावस भाऊ.

तरुणः	(स्वतःला) असं कोण म्हणतं? बरं इथे कशाला आलायस?

ऋतूः	(अनिकेतच्या चेहर्‍यावरून हात फिरवत) किती दिवस झाले, आपण नाही भेटलो म्हणून मी तुला भेटायला आलो.

तरुणः	सॉफ्टवेअर मध्ये बिघाडाय वाटतं, तू फक्त भेटायला येणार नाहीस. तुझा नेहमीच काहीतरी छूपा उद्देश असतो. (अनिकेतकम्प्युटरवर बटणं दाबतो, ऋतू फ्रिज होतो, यांत्रिकपणे एका जागेवर बसतो) शू...श आवाज नको करू, सगळे लोक स्वार्थी असतात, तसा तू।

ऋतूः	(हिरमुसल्या सारखा) तू मला शिवी का देतोस?

तरुणः	स्वार्थी म्हणजे काय शिवी नाही. (कंप्यूटर वर बीप ऐकू येते) म्हणजे तशी शिवीचाय, पण statistically हे प्रुफ झाले आहे की, सगळे लोक स्वार्थी असतात.

ऋतूः	म्हणजे?

तरुणः	मला सांग कोण आहे मी?

ऋतूः	स्वार्थी!

तरुणः	नाहि रे, मी कोण आहे?

ऋतूः	(विचार करत) अनिकेत! माझा लाडका मावस भाऊ.

अनिकेतः	यूसलेस त्याच्या पलीकडे काही तरी असेल ना

ऋतूः पलीकडे तर (ऋतू स्वतःकडे निर्देश करत) ऋतू.

अनिकेतः मी (स्वतःकडे निर्देश करत)मी कोण?

ऋतूः तू कोण.

अनिकेतः (मोठ्याने) कोण? कोण? कोण?

ऋतूः कोण-कोण-कोण, कोण-कोण-कोण. (गाणं म्हणल्या सारखं)

अनिकेतः (चालीत) कुठे? काय? कोण?

ऋतुः (चालीत) तु कोण-कोण, तु कोण-कोण.

अनिकेतः तेच! मी कोण आहे?

ऋतूः तुला माहित नाही तू कोण आहेस?

अनिकेतः (संतापून) मी statistician आहे, मी certainty शोधतो आणि statistics सांगतं ते मान्य करण मला भाग आहे, पूर्व अनुभवावरून हे स्पष्टचाय, की तू नक्की इथून काहीतरी ढापणार, सांग आता कशावर डोळा आहे तुझा?

ऋतूः कशावर नाही.

अनिकेतः खोटं बोलू नकोस, दरवेळेला येतोस आणि काही ना काहीतरी माझं घेऊन जातोस, मागच्याला आठवताना, माझी गोट्यांची बरणीच पळवलेलीस (काउन्ट डाऊन-लास्ट थर्टी सेकंड असा आवाज यावा) शीट! (अनिकेत कम्प्युटर जवळ जातो, खटपट करतो) लवकर सांग कुठे आहेत गोट्या?

ऋतूः (लास्ट फिफ्टीन सेकंड्स) कुठल्या गोट्या? मी नाही घेतल्या, अस का वागतोस? मी किती दिवसांनी आलोय.

अनिकेतः तेच! तुला काही पाहिजे असेल तरच फिरकतोस इकडे, (ऋतू रडतोय, टेन नाईन प्रोग्राम एंड होण्याचं काऊंटडाऊन सुरू होतं) लवकर सांग, गोट्या कुठं आहेत? कुठे आहेत गोट्या? (शट डाऊन झाल्या प्रमणे अंधार, फोनची रींग वाजते, लाईट्स फ़ेड इन, ऋतू नसावा.)

अनिकेतः भंगार! भंगार झालंय सिमुलेशन डमी सारखा मॉडेल झाला आहे, ऍडव्हान्स असून काय उपयोग तुमच्या डेटा मुळे, काय? दहा वर्षांपूर्वी भेटलेला, तुम्ही त्याला दहा वर्षांचा केलात।, ही पन्नासावी ट्रायलाय. अजून किती लागणारे डेटा? ठिकाय. पाठवा तुमच्या कंपनीचा माणूस. (फोन ठेवतो, अनिकेतची आई प्रवेश करते.)

आईः काय गोंधळ चाललाय?

अनिकेतः काही नाही काम होतं महत्त्वाचं.

आईः महत्वाचं काम म्हणे! खोली बाहेर तर जात नाहीस जेवण खाणही सोडलयस वाटतं.

अनिकेतः ते बघतो माझं मी आणि तुला माहिती आहे ना मला इथं कोणीही आलेलं आवडत नाही.

आईः तुला माहिती आहे ना? की मला या घरात अक्राळ विक्राळ आवाज आलेले आवडत नाहीत, रडण्याचा आवाज कुठून आला?

अनिकेतः काही नाही ग!

आईः	काय तो सगळीकडे पसारा! दारं खिडक्या बंद करून काम करायची कसली पद्धत तुमची?

अनिकेतः	तू नाही? तुझ्या किचन मध्ये मेसचे डबे करायचे असतात, तेव्हा कसं सगळं उघडतेस, तसंच मी बंद करतो.

आईः	माझ्या किचनला काही बोलायचं नाही. एकेकाळी घर चालायचं आपलं त्यावर.

अनिकेतः	आता काय गरज आहे त्याची? सोडून दे.

आईः	आणि काय करू?तुझे बाबा गेल्यापासून करतीय, आता त्याच्यातच मन लागतं माझं तू असतोस आपल्या महत्वाच्या कामात मग मी एकटीने काय करायचं?

अनिकेतः	बाबांना हार्ट अटॅक आला तेव्हा फक्त आठवीत होतो मी, आता कमवता झालोय आणि ते तेव्हा गरजेचं होतं, आता काय काय गरजाय त्याची? त्यामुळे तू आराम करावास असं मला वाटतं.

आईः	आणि तू या पडक्या खोलीतून बाहेर पडावंस असं मला वाटतं.

अनिकेतः	आता लॉकडाऊन मध्ये लागलेली सवय.

आईः	वाईट सवय आहे ती.

अनिकेतः	वाईट परिस्थितीत लागतात वाईट सवयी.

आईः	मग आता मोडा ती सवय बाहेर जा! फिर! चार नवीन लोकांना भेट.

अनिकेतः	यूसलेस! सगळे लोक सारखेच असतात आणि नवीन लोकांना handle करायला माझ्याकडे वेळ नाहीये कारण तो ऋतू परत येतोय.

आईः किती वर्षांनी येतोय, आता कसा असेल रे तो?

अनिकेतः जसा होता तसाच असेल. पण गावाहून इतक्या लांब इथं कशाला येतोय?

आईः मीच बोलावलय

अनिकेतः का?

आईः तेवढाच आपल्याला चेंज, किती दिवस झाले आपल्याकडे कोणी आलं नाही.

अनिकेतः कशाला कोण यायला पाहिजे दरवेळेला कोणतरी येतं आणि आपलं काही ना काहीतरी घेऊन जातं.

आईः या वेळेला आपल्याला काहीतरी मिळेल ऋतू कडून खिरीची रेसिपी मागवलीय मी, माझ्या माहेरची स्पेशालिटी आहे ती रेसिपी.

अनिकेतः तू आणि खीर?

आईः इथे आले आणि माझा खिरीची चवच गेली, तुला पटणार नाही पण लग्नाधी खूप छान खीर करायचे मी, तेव्हाचे दिवसच वेगळे होते!

अनिकेतः तू आजचं बघ, तो ऋतू येणार आणि शंभर टक्के काहीतरी नेणार. पण काय नेणार आलाच तर खरच काही परत देणार?

आईः तुला काय हवंय?

अनिकेतः गोट्या.

आईः काय?

अनिकेतः	माझी लहानपणीची गोट्यांची बरणी, जी त्याने हिसकावून नेली.

आईः	गोट्यांनी खेळायचं वय आहे का तुझं?

अनिकेतः	तेच त्या वयात जमलं नाही मला, आता आला की काढूनच घेणार त्याच्याकडून त्याची पूर्वतयारी चालू होती.

आईः	सगळ्याच गोष्टी काही  परत मिळत नसतात.

अनिकेतः	उदाहरणार्थ?

आईः	माणसं!

अनिकेतः	माणूस म्हणजे काय गोष्ट आहे? ऋतूने पळवलेली एक बरणी, त्यातल्या गोट्या ही एक खरी वस्तुनिष्ठ गोष्ट मला परत हवी आहे.

आईः	ऋतू आल्यावर बघशीलच.

अनिकेतः	आल्यावर काही करू शकतो तो, त्याच्याबद्दल खात्रीने काहीतरी सांगता आलं पाहिजे.

आई :	खात्रीचं काय लोणचं घालणारास?

अनिकेतः	ते तू घाल किचन मध्ये जाऊन, मला माझं काम करु दे.

आईः	हो माहितीये खूप काम असतं तुला.

अनिकेतः	(टेबलाजवळ जातो, कानात हेडफोन घालतो.) आता मलाही अक्राळविक्राळ आवाज ऐकू येणार नाहीत (काम करायला लागतो, प्रवेशाच्य जागी प्रकाश केंद्रित व्हावा, आई चिडून त्याच्या कानातले एअर फोन काढते)

आईः		गॅलरीच दार उघड, किती कोंदट वाटतंय या खोलीत!( निघून जाते, घराची बेल वाजते)

अनिकेतः	आला बहुतेक. (जाऊन दार उघडतो, परत जागेवर उभा राहतो,  एक माणूस प्रवेश करतो, गूढ पार्श्र्वसंगीत सुरू व्हावं) कोण तुम्ही?

माणूसः	सेल्समनाय, कंपनीकडून आलोय.

अनिकेतः	या या बसा, काय घेणार?

माणूसः	काही नको.

अनिकेतः	चहा?

माणूसः	नको.

अनिकेतः	कॉफी?

अनिकेतः	कोल्ड्रिंक (माणूस विचारात) कोक पेप्सी वगैरे?

माणूसः	नको.

अनिकेतः	अहो काहीतरी घ्या आपलंच घर समजा.

माणूसः	असं का! बरं मग एक पेप्सी!

अनिकेतः	पेप्सी प्यायला आलाय का? सिमुलेशन मध्ये किती बग्ज झालेत ना ते चेक करा पहिले, तुमच्या डेटा मुळे.

माणूसः	(समोर हाताने इशारा करतो पार्श्वसंगीत थांबत) काय? आमच्या डेटा मूळे?

अनिकेतः हो (माणूस कम्प्युटर जवळ जातो स्टेथोस्कोप काढतो, चेक करायला लागतो) अहो काय?

माणूसः आवाज येत नाहीये (माणूस चेक करण्यात मग्न)

अनिकेत; आवाज! काय चाललय?

माणूसः (गंभीरपणे) आवाज येत नाहीये!

अनिकेतः कुठला आवाज? काय डोक्यावर पडलाय का?

माणूसः मग?

अनिकेतः कीबोर्डने नीट चेक करा (माणूस चेक करतोय अनिकेत याचा स्तेतस्कॉप हाताळतो माणसाचा हार्टबीट चेक करतो)

माणूसः (गुदगुल्या झाल्यासारखं) जावा तिकडे!

अनिकेतः (परत चेक करतो) आवाज येत नाहीय! (स्वतःला लावून बघतो, अनिकेतला गुदगुल्या होतात, परत ठेवून देतो)

माणूसः डेटा मध्ये काहीच प्रॉब्लेम नाहीये.

अनिकेतः मग?

माणूसः तुमचा डेटा कमी पडतोय.

अनिकेतः डेटा कमी पडतोय? तुमच्या कंपनीने प्रॉमिस केलेलं एवढ्यात सिमुलेशन वर्क होईल म्हणून.

माणूसः वर्क होईल असं प्रॉमिस केलेलं आणि ते होतंय सुद्धा.

अनिकेतः होतय?

माणूसः	तर

अनिकेतः	पण अजून ॲक्कुरसी लागणार.

माणूसः	हा खरं कसं वर्क होईल याचं प्रॉमिस केलं नव्हतं आणि जर अजून अक्युरॅसी हवी असेल तर अजून डेटा लागणार. धन्यवाद.

अनिकेतः	एक टेराबाईट डेटा पुरत नाही?

माणूसः	माणसाचा सिमुलेशन करताय ना? पेटा बाईट तरी पुरा पडेल का कुणास ठाऊक? (परत गूढ पार्श्र्वसंगीत सुरू व्हाव, अनिकेत हात दाखवून थांबवण्याचा प्रयत्न करतो संगीत अजून जोरात वाजतं, अनिकेत कम्प्युटरवरून संगीत बंद पडतो)

अनिकेतः	ॲक्युरॅसी येणारच नसेल तर विकता कशाला?

माणूसः	त्याच्याशी कंपनीचा काय संमंद? तुम्हाला डेटा हवा होता, आम्ही तो दिला.

अनिकेतः	मला रिफंड हवाय!

माणूसः	ते शक्य नाही, आमची नो रिफंड पॉलिसी आहे ना.

अनिकेतः	तुम्हाला कन्झ्युमर कोर्टात खेचेन!

माणूसः	(गूढ पार्श्र्वसंगीत सुरू होतं) काय वाट्टेल ते करा, पण रिफंड काही शक्य नाही, तुम्ही जुने कस्टमर आहात म्हणून 40 टक्के डिस्काऊंट देतो, पुढच्या डेटा वर (आई प्रवेश करते)

आईः	काय? 40 टक्के डिस्काउंट मला हवा आहे डेटा.

अनिकेतः तुला कशाला?

आईः मी ऑनलाईन बिझनेस सुरू करेन, मग मला माझे कस्टमर्स आणखीन चांगले टार्गेट करता येतील मग एकदा का ऋतूने खीरीची रेसिपी आणली की मग काय? पैसाच पैसा.

माणूसः एक नंबर आमच्याकडे एकापेक्षा एक ऑफर्स आहेत तुमच्यासारख्या स्मॉल बिजनेस ना मार्केट देण्यासाठी, लगेच सिलेक्ट करा म्हणजे आजच माझं टार्गेट पूर्ण होईल!

अनिकेतः डेडलाईन जवळ आली आहे वाटतं, (खोट्या सहानुभूतीने)

माणूसः होय.

अनिकेतः कॉम्पिटिशन वाढलीय वाटत?

माणूसः होय, आम्हाला तर मिनिटामिनिटाला अपडेट व्हावं लागतं.

अनिकेतः मिनिटामिनिटाला! खूप टेन्शन येत असेल ना?

माणूसः काय सांगू जरा इकडे तिकडे झालं की पेनल्टीस पडतात.

अनिकेतः समजा जर काहीतरी झालं, आणि डेडलाईन पूर्ण नाही झाली तर?

माणूसः मग काय डायरेक्ट टर्मिनेट.

अनिकेतः आई अजिबात घेऊ नकोस यांचा डेटा! एक नंबरचा फॉल्टी डेटा आहे यांचा.

माणूसः आमच्या डेटाला काही बोलायचं नाही. तुम्हालाच नीट जजमेंट देता येत नाही.

अनिकेतः काहीही बोलू नाका! असंख्य probabilities एकमेकांवर स्टॅक केल्यात, एवढी प्रोसेसिंग पावर कधीच कोणी वापरली नसेल या सगळ्यावर conclusion काढून हे सिम्युलेशन उभा केलय. खेळ वाटला काय?

माणूसः खेळचाय, एवढी सोपी गोष्ट त्यासाठी  सिमुलेशन उभा केलत तुम्ही.

माणूसः एवढी सोपी गोष्ट आहे ना? मग करा तुम्ही.

माणूसः करतो की.

अनिकेतः आणा नवीन होलोग्राम.

माणूसः त्याची काय गरजाय? आपण आहे ना.

अनिकेतः काय ॲक्टिंग करायची नाही.

माणूसः तुम्हाला मॉडेल मिळाल्याशी मतलब ना.

अनिकेतः काय कॉन्फिडन्स आहे, एवढं सॉफ्टवेअर एवढा डेटा वापरून करू शकलं नाही ते हे करणार म्हणे!

माणूसः please! मला कॉन्सन्ट्रेट करू द्या. (ध्यान करून)

आईः तुम्हाला पाहिजे असेल तर तुम्ही तिकडे जा एकदम रिलॅक्स वाटेल! (माणूस गॅलरी कडे जातो)

अनिकेतः गॅलरीकडे पाठवायची काय गरज होती?

आईः किती दिवस झाले बंद आहे ती गॅलरी, आता त्या निमित्ताने तु ही जाशील!

अनिकेतः केवढी उंच आहे ती गॅलरी, तिथून खाली बघितलं की विचित्र दिसत असतं सगळं.

आईः तेव्ढच रे गंमत घ्यायची त्या विचित्रपणाची! ( माणूस प्रवेश करतो)

माणूसः इतक्या वर्षांनी भेटतो आपण तरी आपल्या मध्ये काहीतरी आपुलकीचं नाताय असं वाटणारच तुम्हाला, कारण मी या अनिकेतचा लाडका मावस भाऊ, ऋतू!

अनिकेतः आता ऋतू सारखं चालून दाखवा (माणूस चालून दाखवतो)

आईः असाच चालत असावा ऋतू.

अनिकेतः असा अजिबात चालणार नाही ऋतू.

माणूसः अहो मी ऋतु आहे ना मी असाच चालतो.

अनिकेतः उगाच एक कॅरिकेचर पकडलं म्हणजे काय ऋतू झालात काय? ते पृव करून दाखवता आलं पाहिजे.

माणूसः तुम्ही असंच म्हणणार! तुम्हाला जर पटत नसेल तर तुम्ही डिसप्रूव करून दाखवा.

अनिकेतः (विचार करतो) ठीकाय, मी तुम्हाला काही प्रश्न विचारतो त्याची बरोबर उत्तर द्या.

माणूसः विचारा.

अनिकेतः प्रश्न क्रमांक एक ऋतु इथे आल्यावर पहिलं काय करेल? प्रश्न क्रमांक दोन ऋतूने एक माजी गोष्ट घेतलीय, ती गोष्ट कोणती? या दोन प्रश्नांची उत्तरे द्या, मग पुढचं पुढे बघू.

माणूसः (खूप डोक्याला त्रास देऊन) ऋतू पाहिला या खोलीत येईल, तुमचा कॉम्प्युटर हाताळे आणि जोरजोरात हसेल.

अनिकेतः का?

माणूसः की तो स्वतः इथे येणार होता आणि तुम्ही उगाचच त्याचं सिमुलेशन उभा केलत.

अनिकेतः दुसरा प्रश्न.

माणूसः गोट्यांची बरणी ही त्याने तुमच्याकडून घेतलेली गोष्ट.

अनिकेतः तशी बरोबर उत्तर दिली तुम्ही पण ती काय डेटा मुळे सहज मिळाली असतील, मी तुम्हाला तिसरा आणि सगळ्यात अवघड प्रश्न विचारतो.

माणूसः विचार!

अनिकेतः ऋतू आणि मी एका विशिष्ट जागी गोट्या खेळायचो, त्या जागेचं नाव काय? (माणूस तीव्रतेने विचार करतो) हे सापडणं अशक्याय, कारण ही तेव्हाची गोष्ट आहे जेव्हा सिमुलेशन डेटा कुठे आसपासही नव्हतं.

माणूसः (खूप विचार करून) गॅलरी? हा गॅलरीच!

अनिकेतः तुम्हाला कसं कळलं?

माणूसः मी कल्पना केली की ऋतू आला तर कुठे खेळेल? मग माझ्या लक्षात आलं की गॅलरी च प्लॅन हे ओबड-धोबडाय आणि ऋतू गावाहून येतो, तर त्याला ओबड-धोबड प्लॅन वरच खेळायची सवय असणार. गॅलरी म्हटल्यावर तुमचं तोंड बघितलं मग काय खात्रीच पटली.

अनिकेतः म्हणजे तुम्ही डोक्यात सिम्युलेट केलं आणि ते ऍक्युरेट निघालं?

माणूसः हा असेही म्हणू शकतो.

अनिकेतः शेवटचा प्रश्न विचारतो.

आईः तुम्ही चला मला ऑफर्स दाखवा, याचं काही खरं नाही.

अनिकेतः फक्त एक शेवटचा प्रश्न.

माणूसः बास झाले की तुमचे प्रश्न! कामा-धंद्याच बघू का नको आम्ही?

अनिकेतः ऋतु गोट्या परत करेल का?( माणूस आणि आई किचनमध्ये चर्चा करत निघून जातात, अनिकेत उध्वस्त झाल्या सारखा, काही वेळाने ऋतू प्रवेश करतो गॅलरीकडे निघून जातो, त्याच्यामागे अनिकेत ही जातो, अंधार.)

## प्रवेश २

(गॅलरीचे दृश्य, मंद प्रकाश, गॅलरीचे तोंड प्रेक्षकांच्या दिशेने, ऋतू आधीपासून उभा असावा, अनिकेत प्रवेश करतो.)

अनिकेतः तू खरच इथे आलास कि मला स्वप्न पडलय? (ऋतु त्याला बरणी देतो)

ऋतूः त्याने काय फरक पडतो? तुला जे हवय ते मिळालय तुला, (अनिकेत बरणी उघडतो.)

अनिकेतः ही बरणी तर रिकामीच आहे.

ऋतूः ती ऋतू आल्यावरच भरेल.

अनिकेतः मग तू कोण आहेस?

ऋतूः मी? मी तूच आहे. मी खरा नाहीये पण माझं अस्तित्व स्वतंत्र आहे, मी कायम असेन या गॅलरीमध्ये, तुझी वाट बघत, फक्त मला असं एकट्याला ताटकळत, ठेवू नकोस (अनिकेत त्याला मिठी मारतो) गोट्यांनी ही बरणी पुन्हा भरेल याची खात्री मी तुला देऊ शकत नाही पण मी गोट्यांनी भरलेली बरणी तुला दाखवू शकतो.

अनिकेतः खरंच?

ऋतूः बघ. (ऋतू अनिकेतला बरणी उघडून दाखवतो त्यातून त्या दोघांवर प्रकाश पडावा, अंधार)

मनात चा पहिला प्रयोग भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्राच्या, सर्जनशाळेत होणा-या, ‘प्रयोग-प्रक्रिया’ या उपक्रमात सादर झाला.

लेखक-दिग्दर्शकः मल्हार दंडगे

पार्श्वसंगीतः सुयश बाबर

प्रकाशयोजनाः धवल स्मार्त

नेपथ्यः सिद्धी मुळ्ये

वेशभूषाः मल्हार दंडगे

मंचव्यवस्थाः जयदीप कोडोलीकर

भूमिका

अथर्व परांजपे

अमन सोळंकी

जयदीप कोडोलीकर

अनुष्का मुळ्ये

[‘हाकारा’मध्ये मराठी आणि इंग्रजी भाषेतुन लिहिणाऱ्या तरुण लेखकांचे, कलाकारांचे साहित्य प्रकाशित करत आलो आहोत. कोल्हापुरातील भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्र आणि सर्जनशाळा यांच्या ‘प्रयोग- प्रक्रिया’ या उपक्रमाअंतर्गत मल्हार दंडगे याने लिहिलेली एकांकिका आणि स्वतःच्या लेखनाविषयीचे मल्हारचे टिपण आम्ही ‘हाकारा’च्या १६ व्या आवृत्तीत (ऑगस्ट२०२२) प्रकाशित करत आहोत.]